# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 10 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमासाठी यंदा चार कोटींपेक्षा अधिक जणांची नोंदणी
- मनपा निवडणुकीत राजकीय पक्षांकडून आता परस्परविरोधात पोलिस तक्रारी
- छत्रपती संभाजीनगर इथल्या अकराव्या अजिंठा वेरूळ चित्रपट महोत्सवाची घोषणा

आणि

- नांदेड इथं उद्या २१ व्या लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचं आयोजन

****

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमासाठी यंदा चार कोटींपेक्षा अधिक जणांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षी गिनीज बुकमध्ये नोंद झालेल्या साडे तीन कोटींपेक्षा ही संख्या अधिक आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सामाजिक माध्यमांवरील संदेशात, परीक्षेचा तणाव कमी करणारा हा कार्यक्रम म्हणजे देशव्यापी चळवळ झाल्याचं सांगत, सर्व परीक्षार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचं आवाहन केलं.

****

५३वा नवी दिल्ली जागतिक पुस्तक महोत्सव आजपासून दिल्लीत भारत मंडपम इथं सुरू झाला. धर्मेंद्र प्रधान यांनी या महोत्सवाचं उद्घाटन केलं. या नऊ दिवसांच्या महोत्सवात प्रकाशक, लेखक, वाचक आणि सांस्कृतिक वर्तुळातले प्रतिनिधी एकत्र येत आहेत. ३५ देशांमधल्या एक हजारापेक्षा जास्त प्रकाशकांनी यात भाग घेतला आहे. विविध विषयांवरची असंख्य पुस्तकं इथं वाचकांसाठी उपलब्ध आहेत. यंदा या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, 'भारताचा लष्करी इतिहासः शौर्य आणि बुद्धिमत्तेची ७५ वर्षं' अशी आहे. या विशेष दालनात या संकल्पनेशी संबंधित ५००

पेक्षा जास्त पुस्तकं आणि शंभरपेक्षा जास्त कार्यक्रम नागरिकांना अनुभवता येणार आहेत.

****

जागतिक हिंदी दिवस आज साजरा होत आहे. शिक्षण, सांस्कृतिक आदान-प्रदान यासह आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदी भाषेच्या वापराला प्रोत्साहन देणं, हे या दिवसाचं उद्दिष्ट आहे. २००६ मध्ये आजच्याच दिवशी नागपूरमध्ये पहिली जागतिक हिंदी परिषद आयोजित करण्यात आली होती. तेव्हापासून, दरवर्षी १० जानेवारी हा दिवस जागतिक हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो.

****

सार्वजनिक आरोग्य विभागात कार्यरत अधिकाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती कामगिरीवर आधारित मूल्यांकन अहवालानुसार पारदर्शकपणे करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत. ते आज मुंबईत याबाबतच्या आढावा बैठकीत बोलत होते. नागरिकांना आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देण्यासाठी सीएसआर देणाऱ्या संस्थांना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना आबिटकर यांनी दिल्या.

****

राज्यात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराने वेग घेतला आहे. प्रचारादरम्यान होणाऱ्या आरोप प्रत्यारोपांसोबतच आता राजकीय पक्षांकडून परस्परांविरोधात पोलिस ठाण्यात तक्रारी दाखल होत असल्याचं दिसून येत आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं MIM च्या उमेदवारासह ११ जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यावर दुसऱ्या उमेदवाराच्या प्रचारात अडथळे आणल्याचा आरोप आहे.

छत्रपती संभाजीनगर इथले भाजप उमेदवार रेणुकादास वैद्य यांचं सोशल मीडिया अकांउंट हॅक झाल्याचा प्रकार आज निदर्शनास आला. याबाबत सायबर पोलिसांकडे तक्रार देखील देण्यात आली आहे.

****

भारतीय जनता पार्टीनं पक्षाच्या मुंबई आणि नागपूरमधल्या ५८ पदाधिकाऱ्यांना पक्षविरोधी कारवाया आणि बेशिस्त वर्तणुकीबद्दल सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. निलंबित नेत्यांमध्ये माजी महापौर, नगरसेवक आणि प्रमुख कार्यकर्त्यांचा समावेश आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध बंडखोरी करणं, पक्षाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणं, महायुतीच्या उमेदवारांना सहकार्य न करणं यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे.

****

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातला सह-आरोपी तुषार आपटे यानं कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेतल्या 'स्वीकृत' नगरसेवक पदाचा राजीनामा दिला आहे. भारतीय जनता पक्षानं काल त्याची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर विरोधकांनी केलेल्या टीकेनंतर त्याने राजीनामा दिला. वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानेही या निर्णयावरून भाजपावर कडाडून टीका केली.

****

वामनभाऊ महाराज यांचे विचार समाजाला आध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे तसंच काळाच्या ओघातही सुसंगत असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. बीड जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातल्या गहिनीनाथ गड इथं संत वामनभाऊ महाराजांच्या ५०व्या, सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्यासह बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यातले अनेक भाविक यावेळी उपस्थित होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा आज करण्यात आली. दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, महोत्सवाचे संचालक दिग्दर्शक सुनील सुकथनकर तसंच उद्योजक नंदकिशोर कागलीवाल, यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. २८ जानेवारी ते एक फेब्रुवारी या दरम्यान छत्रपती संभाजीनगर इथं प्रोझोन मॉलमधल्या आयनॉक्स थिएटरमध्ये हा महोत्सव होणार आहे. जागतिक पातळीवरच्या अनेक कलावंतांच्या उपस्थितीत अनेक चित्रपटांचं प्रदर्शन या महोत्सवात करण्यात येणार आहे.

****

केंद्र सरकारनं नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं. या योजनेमुळे रोजगारांना गती मिळून आर्थिक हातभार चांगला लाभेल अशी अपेक्षा जालना जिल्ह्याच्या घनसावंगी तालुक्यातल्या तिर्थपुरी इथले ओमप्रकाश उढाण यांनी व्यक्त केली. ते म्हणाले –

**बाईट – ओमप्रकाश उढाण**

****

दरम्यान, जालन्याचे काँग्रेसचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी या योजनेच्या मुद्यावरून केंद्र सरकारवर टीका केली आहे. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना काळे यांनी, या योजनेतील निधीच्या वाटपातही बदल करून राज्यांवर ४० टक्के आर्थिक भार टाकण्यात आल्याने, आर्थिक अडचणीत असलेली राज्यं मनरेगाची कामे राबवू शकणार नाहीत, असं म्हटल्याचं, आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

****

२१ व्या लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचं उद्या नांदेड इथं आयोजन करण्यात आलं आहे. मालेगाव रस्त्यावरील गजानन मंदिर परिसरात आयोजित या संमेलनाला सकाळी ९ वाजता प्रारंभ होईल. रविचंद्र हडसनकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या संमेलनात कथाकथन, कविसंमेलन, प्रकट मुलाखत, एकपात्री प्रयोग आदी कार्यक्रम होणार आहेत. सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय तसंच प्रशासकीय सेवेतल्या योगदानासाठी लोकसंवाद पुरस्कारही या संमेलनात प्रदान केले जाणार आहेत

****

छत्रपती संभाजीनगर इथं मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १४ तसंच १५ जानेवारीला मतदान केंद्रावर अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांची ने – आण करण्यासाठी एसटी महामंडळ १९० बस देणार आहे. यामुळे या कालावधीत अनेक मार्गावरील बसफेऱ्या रद्द होणार आहेत. प्रवाशांनी याची नोंद घेण्याचं आवाहन एसटीचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर तीन वर्षांत १५ पट परतावा देण्याचं आमिष दाखवत ८३ लाख ७५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मनी प्लॉट ग्रोथ कंपनीचा चालक संतोष तुकाराम कोकाटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

****

राज्यात आज अहिल्यानगर इथं सर्वात कमी साडे आठ अंश तर तर पुण्यात साडे नऊ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात बीड इथं साडे दहा, छत्रपती संभाजीनगर इथं दहा पूर्णांक आठ तर परभणी इथं अकरा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****